**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट  दिनांक – २२/०९/२०२४

**दि. २१/०९/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३८६/२०२४ भा न्या संहिता का कलम. ३१८(४),३१६(२) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (D) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९/०८/२०२४ रोजी ते २३/०८/२०२४ रोजीचे दरम्यान. सी.१३०२, सिल्वर पाम सोसायटी, रावेत, ता. हवली, जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०९/२०२४ रोजी १८.३९ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय ३५ वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी रा., रावेत, ता. हवली, जि. पुणे |
| आरोपी | :- | १) अनोळखी बँक अकाऊंट धारक /टेलीग्राम धारक नाव पत्ता माहित नाही. |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी असताना @Shraddharama79113 या युजर नेम टेलीग्राम वेबसाईट वरून एका महीलेने पार्ट टाईम जॉबसाठी मेसेज केला व टेलीग्राम वेबसाईट वर एका ग्रुप मध्ये ॲड केले सदर ग्रुप total jobs २०२४ Group १५ Th या नावाने आहे व सुरवातीला त्यांनी https//suncrypro58.com/#/mine या लिंकवर फिर्यादी यांचे अकाउंन्ट बनवुन फिर्यादी यांना तेथे काही प्रीपेड टास्क करण्यास सांगीतले गेले व रक्कम वेगवेगळया खात्यात जमा करण्यास सांगितले गेले ती रक्कम ऑनलाईन प्रिपेड टास्क मध्ये वापरली जाईल व नंतर ती रक्कम कमिशन सहित परत केली जाईल असे सांगितले असता फिर्यादी यांना गोल्ड माईनींगची एक टास्क करायला सांगितले, ती टास्क केल्यानंतर त्यांनी पैसे बँक खाते मध्ये जमा केले नाहीत त्यानंतर त्यांनी वेगळया बॅक खाते मध्ये पैसे जमा करुन टास्क करण्यास सांगितले तो टास्क झाल्या नंतर सुध्दा फिर्यादी यांचे बॅक अकाऊट मध्ये पैसे आले नाही फिर्यादी यांचे लक्षात आले की, टेलीग्रामवर टास्क देवून पैसे कमविण्याच्या इरादयाने फिर्यादी यांची एकुण २१,९५,१०२/- रूपये ऑनलाईन पध्दतीने आर्थीक फसवणुक झालेली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री नितीन फटांगरे वपोनि सो .९४२३६६९२९१ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ६४४/२०२४ बी.एन.एस कायदा कलम ११०,२८१ मो.वा.का.कलम १८४,१८५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०९/२०२४ रोजी १४.४० वा.चे सुमारास भांबोली गाव ते आंबेठाण जाणारे रोडवर अवेनवा कंपनीचे समोर ता. खेड जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२४ रोजी००.१७ वा. |
| फिर्यादी | :- | पांडुरंग लाला रनगट वय ३१ वर्षे ,व्यवसाय नोकरी ,रा. जित्राई मळा चाकणता.खेड जि.पुणे |
| आरोपी | :- | रवि बबन राठोड, वय ३२ वर्षे ,व्यवसाय चालक रा.वराळे ता.खेड जि.पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे ताब्यातील मोटार सायकल नंबर एम.एच.४२/बी.सी.८०५१ हीचे वरुन जात असताना फिर्यादीचे समोरुन येणारे टेंम्पो नंबर एम.एच.१४/के.क्यु.९७८५ वरील चालकाने त्याचे ताब्यातील टेंम्पो हा अचानक उजव्या बाजुकडे वळवल्याने फिर्यादी सदर टेम्पोस धडकुन जखमी झाले सदर टेम्पो चालक हा दारु पिवुन टेंम्पो चालवुन दारु पिवुन गाडी चालवणे हे धोकादायक असल्याची जाणिव असतांना सुध्दा सदर कृत्य करुन फिर्यादीचे किरकोळ व गंभिर दुखापतीस कारणीभुत झाला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गिरणार ९८८१०९७७१९ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ६६४/२०२४ भा.द.वि.कलम ४१९, ४२०,४६५, ४६७,४६८, ४७१,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १७/१२/२०२१ रोजी मौजे चाकण येथील दुयम निबंधक कार्यालयात ता. खेड जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०९/२०२४ रोजी १७/०९वा |
| फिर्यादी | :- | आंनदा दामु भोसले, वय ६० वर्षे, धंदा शेती, शिक्षण ३ री, रा. पाडळी, वाडा रोड, ता. खेड जि. पुणे |
| आरोपी | :- | १)गोविंदा ऊर्फ् रामु दामु भोसले, रा. पाडळी ता. खेड जि. पुणे, (खरेदी देणार),<br>२) धिरज कुमार सुरेंद्र शेठीया रा. चाकण ता. खेड जि. पुणे, (खरेदी घेणार),<br>३) सुनिल गणपत वाळुंज रा. शिरोली ता. खेड जि. पुणे (साक्षीदार),<br>४) दिपक कोंडीभाऊ पाबळे रा. कडघे ता. खेड जि. पुणे (साक्षीदार) व<br>५) साठेखताला माझे जागी उभा राहिलेला तोतया व्यक्ती तसेच (पत्ता माहित नाही )<br>६) रविंद्र कर्नावट वकील रा.खेड<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मौजे चाकण येथील दुयम निबंधक कार्यालयात ता. खेड जि. पुणे येथे आरोपी १ ते ६ यांनी मिळुन संगनमत करुन फिर्यादीचे पाडळी येथील गट नं ३६५/२ मधील फिर्यादीचे वडीलोपार्जीत सामाईक क्षेत्रापैकी आरोपी क्रं १ यांचे हिस्याचे ४१ आर क्षेत्राचे विक्रीसाठी साठेखत क्र १२९२२/२०२१ प्रमाणे तयार करुन सदर दस्तासाठी कायदेशिर मान्यता देणार म्हणुन फिर्यादीचे सही अंगठे आवश्यक असतांना वरील इसमांनी संगनमत करुन फिर्यादी ऐवजी दुसराच कोणीतरी व्यक्ती उभा करुन त्यावर फिर्यादीचे खोटे व बनावट सहया अंगठे करुन सदर दस्ताचा वापर करुन खरेदी खत करुन त्याव्दारे फेरफार करीत असतांना आढळुन आले आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि तलवाडे ९६५७२२०९६६ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ५५४/२०२४ बी एन एस कायदा कलम २०२३ चेकलम ११८(२),११८(१),११५,३५२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०९/२०२४ रोजी १७/३० सुमारास. समर्थ हौसिंग सोसायटी, रुपीनगर तळवडे पुणे येथे फिर्यादीचे राहते घरी |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२४ रोजी ०५/३१ वा |
| फिर्यादी | :- | रविंद्र विठठल सोनवणे वय ५५ वर्ष धंदानोकरी राह. के/ऑ. देवीदास बिरादार यांची खोली समर्थ हौसिंग सोसायटी, रुपीनगर तळवडे |
| आरोपी | :- | अमोल अरुण गायकवाड वय ३० वर्ष, धंदा-काहीनाही, राह. छोटी ज्ञानदिप शाळेजवळ, रुपीनगर तळवडे पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे घरी त्यांचे पत्नी व,मुलगी असे घरी असताना फिर्यादी यांचा जावई आरोपी क्रं १ हे त्यांचे घरी आले ते फिर्यादी यांची मुलगी नामे पुजा गायकवाड हिचे सोबत माझा फोन का घेतला नाही याकारणावरुन वाद घालुन फिर्यादी यांचे जावयाने फिर्यादी यांचे मुलीस हाताने मारहाण करुन शिविगाळ करु लागले. फिर्यादी यांची पत्नी सौ. मंगल सोनवणे हि त्यांची भांडणे सोडवणेसाठी मधी पडली असता आरोपीने तिला ही मारहाण केली. तसेच फिर्यादी हे त्यांची भांडणे सोडवत असताना आरोपीने फिर्यादीचे डावे कानावर, तोंडावर त्यांचा मोबाईल फोन हातात घेवुन मारहाण करुन त्या मारहाणीत फिर्यादी यांचे कानास जखम होवुंन फिर्यादी यांचे तोंडतील वरचा एक दात पडला. तसेच फिर्यादी यांची मुलगी पुजा गायकवाड हिचे डोक्यात आरोपीने मोबाईल फोन मारुन तिलाही जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | एस.एस.देवकर, पोलीस उपनिरीक्षक, ९६५७८०४६५५ |

८

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ५५३/२०२४ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क), २०(ब) (ii) (अ) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०९/२०२४ रोजी २०.४५ वाजताचे सुमारास आशापुरी पान शॉप, कुदळवाडी, चिखली, पुणे या ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२४ रोजी ००/४० वा |
| फिर्यादी | :- | अमर शिवाजी कांबळे, पोलीस नाईक बक्कल नंबर १८५४, नेमणुक चिखली पोलीस स्टेशन |
| आरोपी | :- | अरशद अक्रम मलिक वय २३ वर्षे, राह.विशाल यादव यांचे गोडावुन मध्ये, पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली, पुणे, मुळ राह. कुरमिया, ता.अनहरा, जि.बस्ती, राज्य उत्तरप्रदेश **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यांतील आरोपी याने त्याचे कब्जात २५० ग्रॅम वजनाचा एकुण १२,५००/- रुपये किंमतीचा गांजा हा अंमलीपदार्थ अनाधिकाराने बेकायदेशीररीत्या आपले ताबे कब्जात बाळगताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | राजेश मासाळ ,पोलिस उपनिरीक्षक ७२७६०८७१७० |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०३२/२०२४ बी.एन.एस.कलम १३२,१८९(१)(२),१९०,११५(२),३५२, ३५१(२)(३), प्रमाणे् |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/०९/२०२४ रोजी दुपारी ०२/४५ वा ते ०३/०० वा च्या सुमारास पंजाब नॅशनल बॅक,वाकड,पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०९/२०२४ रोजी २३/२८ वा |
| फिर्यादी | :- | मोहम्मद रझा काद्री, वय ३३ वर्षे, व्यवसाय नोकरी (बॅक मॅनेजर) ,रा.सेव्हन ॲव्हिन्यु सोसायटी, फ्लॅट क्र १०४,बालेवाडी,पुणे |
| आरोपी | :- | १)कौसुर नुर मोहम्मद शेख , २)अल्फिया आरिफ शेख रा. अंकुर हॉस्पीटल जवळ, पोलीस लाईन कार्नर, वाकड,पुणे., ३)रिझवान नुर सय्यद , ४) आवेश मतिन खान , ५)साहील जोगदंड<br>६) आयशा आरिफ शेख सर्व रा. नुर मंजील,पवार नगर,लेन क्र. ०१,थेरगाव,पुणे.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ व २ हे त्यांच्या लहान मुलासोबत बॅकेत आले असताना फिर्यादी यांनी आरोपी यांचे लहान मुलांना चप्पल बुट घालुन सोफयावर खेळु नका असे बोलल्याने फिर्यादी यांचे बोलल्याचा राग येऊन आरोपी क्रं १ व २ यांनी फिर्यादीस हाताने लाथाबुक्यांनी मारहाण करुन नंतर थोडयावेळाने आरोपी क्रं २ हिने तिचे भाऊ बहीण इतर आरोपी मजकुर यांना फोन करुन बॅकेत बोलावुन घेऊन गैरकायदयाची मंडळी जमवुन संगणमताने फिर्यादीस त्यांच्या कामात अडथळा करुन काम करुन देणार नाही अशी धमकी देऊन बॅकमधील अनघा खारकर व इतर कर्मचारी यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | भारत माने,पोलीस उप-निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे, पिं.चिं. ८१०८८८८३५२ |